आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in

शनिवार दिनांक 21/02/२०२६

METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन ‖ पिंपरी चिंचवड व पुणे ‖ पान 4 ‖ अंक 67 ‖ RNI - MAHMAR /2021/51259 ‖ metrocity924@gmail.com

# महानगरपालिकेच्या विविध समित्यांच्या सदस्यांची नियुक्ती




दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये विविध समित्यांचे सदस्य नियुक्त करण्यात आले आहेत. यामध्ये प्रामुख्याने स्थायी समिती, विधी समिती, शहर सुधारणा समिती, क्रीडा कला साहित्य व सांस्कृतिक समिती, शिक्षण समिती, महिला व बालकल्याण समिती या महत्त्वाच्या समित्यांवर विविध पक्षांचे सदस्य यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये भाजप, राष्ट्रवादी व शिवसेना पक्षाच्या सदस्यांची वर्णी लागली आहे.**

### पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थायी समितीमधील सदस्यांची नावे -

पक्ष – भारतीय जनता पार्टी

1.अभिषेक बारणे 2.शालिनी गुजर 3.मनिषा चिंचवडे 4.संदीप कस्पटे 5.सारीका गायकवाड 6.योगिता नागरगोजे 7.कृष्णा सुरकुले 8.शीतल वर्नेकर 9.अर्चना करांडे 10.मधुरा शिंदे

11. बाबासाहेब त्रिभुवन

**पक्ष - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी**

1.सविता आसवानी 2.संतोष कोकणे 3.संदीप वाघेरे

4.विकास साने

**पक्ष - शिवसेना**

1. सुलभा उबाळे

--------------------------------

### पिंपरी चिंचवड महानगरपालिका विधी समितीमधील सदस्यांची नावे -

**पक्ष - भारतीय जनता पार्टी**

1. ज्ञानेश्वर जगताप 2. विनायक गायकवाड

3. कुंदा भिसे 4. सुजाता बोराटे 5. श्रुती डोळस

6. कुशाग्र कदम

**पक्ष - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी**

1. शेखर चिंचवडे 2. वर्षा जगताप 3. तुषार सहाणे

--------------------------------

### पिंपरी चिंचवड महानगरपालिका शहर सुधारण समितीमधील सदस्यांची नावे –

**पक्ष - भारतीय जनता पार्टी**

1. अर्चना सस्ते 2. विनोद नढे 3. कुणाल वाव्हळकर

4. संजय (नाना) काटे 5. सुहास कांबळे

6. उत्तमराव केंदळे

**पक्ष - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी**

1. डॉ. वैशाली घोडेकर - लोंढे 2. अनंत कोऱ्हाळे

3. वैशाली काळभोर

------------------------------

### पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीमधील सदस्यांची नावे -

**पक्ष - भारतीय जनता पार्टी**

1. कैलास कुटे 2. शाम जगताप 3. तानाजी बारणे

4. धर्मपाल तंतरपाळे 5. उदय गायकवाड

6. योगेश लांडगे

**पक्ष – राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी**

1. भाऊसाहेब भोईर 2. जितेंद्र ननावरे

3. प्रमोद कुटे

-------------------------

### पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण समितीमधील सदस्यांची नावे -

**पक्ष – भारतीय जनता पार्टी**

1. पल्लवी वाल्हेकर 2. श्रुती वाकडकर

3. रविना अंघोळकर 4. कविता भोंगाळे

5. रीटा सानप 6. सारिका बोऱ्हाडे

**पक्ष – राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी**

1. प्रियांका कुदळे 2. योगिता बारणे

3. यश साने

------------------------------

### पिंपरी चिंचवड महानगरपालिका महिला व बालकल्याण समितीमधील सदस्यांची नावे -

**पक्ष – भारतीय जनता पार्टी**

1. पल्लवी जगताप 2. नीता पाडाळे

3. रेश्मा भुजबळ 4. शिवानी नरळे 5. राणी पठारे

6. सुप्रिया चांदगुडे

**पक्ष - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी**

1. निकिता कदम 2. सारिका मासूळकर

3. मनिषा लांडे

# मा.नगरसेविका प्रियांका बारसे यांच्या पाठपुराव्याला मोठे यश!

## गवळीनगर मधील 3000 स्क्वेअर फुट मध्ये होणारे जिजाऊ क्लिनिक नागरिकांसाठी वरदान

>>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**गवळीनगर प्रभागातील नागरिकांसाठी दिलासादायक ठरणारे 'जिजाऊ क्लिनिक' उभारण्याच्या कामाला वेग आला असून हे काम सध्या प्रगतिपथावर आहे. मा. नगरसेविका प्रियांका बारसे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे डिसेंबर 2025 मध्ये मंजुरी मिळालेल्या या प्रकल्पाची अंमलबजावणी प्रत्यक्षात सुरु झाल्याने परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. येत्या महिनाभरात काम पूर्ण होणार आहे.**





गवळीनगरमधील स्केटिंग मैदान परिसरात सुमारे 3000 स्क्वेअर फूट जागेत हे जिजाऊ क्लिनिक उभारले जात आहे. प्रभागातील गोरगरीब तसेच सर्वसामान्य नागरिकांना साध्या आजारांसाठी वारंवार भोसरी येथील रुग्णालयात जावे लागत होते. मात्र, पुढील महिनाभरात हे क्लिनिक सुरु झाल्यानंतर नागरिकांना स्थानिक पातळीवरच आरोग्य सुविधा उपलब्ध होणार आहेत.

थंडी, ताप, सर्दी, खोकला यांसारख्या किरकोळ आजारांवर उपचार, सलाईन लावण्याची सुविधा, गर्भवती महिलांची तपासणी तसेच लहान मुलांना विविध लसीकरण सेवा या क्लिनिकमधून दिल्या जाणार आहेत. त्यामुळे लहान मुले, महिला, वृद्ध आणि पुरुष अशा सर्व घटकांना याचा मोठा लाभ होणार आहे.

या 3000 स्क्वेअर फूट क्षेत्रफळाच्या क्लिनिकमध्ये रुग्ण तपासणी कक्ष, ॲडमिट रुम, डॉक्टरांसाठी स्वतंत्र कक्ष, स्टोअररुम, टॉयलेट सुविधा तसेच बाहेर प्रशस्त व्हरांडा अशी सर्व सोयी उपलब्ध असणार आहेत.

गवळीनगर प्रभागासाठी हे जिजाऊ क्लिनिक निश्चितच वरदान ठरणार असून, स्थानिक पातळीवर दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे.

# प्रभागाच्या समस्यांकडे लक्ष वेधत नगरसेविका मनिषा पवार यांनी मांडली ठोस भूमिका!

>>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा संपन्न झाली. या सभेमध्ये प्रभाग क्रमांक 23 मधील विविध नागरी समस्यांकडे लक्ष वेधत भाजपच्या नगरसेविका मनिषा प्रमोद पवार यांनी ठोस भूमिका मांडली.**



प्रभाग क्रमांक 23 मध्ये ड्रेनेज लाईनच्या समस्या मोठ्या प्रमाणात असून, वारंवार चोकअप होत असल्याने तीव्र त्रास सहन करावा सर्वसामान्य नागरिकांना लागत असल्याचे त्यांनी सभागृहात नमूद केले. अनेक घरांमध्ये सांडपाणी तुंबण्याच्या घटना घडत असून त्यामुळे आरोग्याचा प्रश्नही निर्माण झाला आहे.

मूलभूत सोयी-सुविधांवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रशासनाने तातडीने या समस्येकडे लक्ष देत कायमस्वरूपी तोडगा काढावा, तसेच ड्रेनेज लाईनची दुरुस्ती व साफसफाई नियमितपणे करावी, अशी मागणी मनीषा पवार यांनी केली.

या सभेस महापौर रवी लांडगे, आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्यासह शहरातील भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेचे नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रभाग 23 मधील नागरिकांच्या मूलभूत सुविधांसाठी प्रशासनाने त्वरित पावले उचलावीत, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# स्वीकृत सदस्य पदी कैलास बारणे व संभाजी बारणे यांना संधी द्या!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य सभागृहातील तीन स्वीकृत नामनिर्देशित सदस्य राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून नियुक्त करण्यात येणार आहे. या स्वीकृत सदस्य पदी माजी नगरसेवक कैलास बारणे व राष्ट्रवादीचे नेते संभाजी बारणे यांना संधी देण्यात यावी, अशी मागणी कैलास बारणे आणि संभाजी बारणे यांच्या समर्थकांनी राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष योगेश बहल, विरोधी पक्ष नेते भाऊसाहेब भोईर, नगरसेवक नाना काटे यांना निवेदनाद्वारे केली आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीमध्ये राष्ट्रवादीचे एकूण 37 नगरसेवक निवडून आले आहेत यामध्ये आता स्वीकृत नगरसेवक म्हणून राष्ट्रवादीला शहरात तीन स्वीकृत नगरसेवक देता येणार आहे. यासाठी राष्ट्रवादीच्या अनेक इच्छुकांची धावपळ सुरू आहे, अशातच थेरगाव परिसरातून राष्ट्रवादी पक्षाचे नेतृत्व करणारे माजी नगरसेवक कैलास बारणे व ज्येष्ठ नेते संभाजी बारणे यांच्या नावाची चर्चा मोठ्या प्रमाणात होत असताना त्यांच्या समर्थकांनी या दोघांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका सभागृहात संधी देण्याची विनंती केली आहे.





# चेन चोरी करणाऱ्या सराईत टोळीचा पर्दाफाश

## 5.60 लाखांचा मुद्देमाल जप्त, बीड जिल्ह्यातील दोन आरोपी अटकेत

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड शहरात घडलेल्या चेन चोरीच्या गुन्ह्यांचा छडा लावत मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. बीड जिल्ह्यातील सराईत दोन आरोपींना अटक करून 28 ग्रॅम 500 मिलीग्रॅम वजनाचे अंदाजे 4 लाख 10 हजार रुपयांचे सोन्याचे दागिने तसेच 1.50 लाख रुपये किमतीची मोटारसायकल असा एकूण 5 लाख 60 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**




या कारवाईत चार चेन चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीत चेन चोरीचे गुन्हे उघड करण्याबाबत मा. पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी गुन्हे शाखेच्या सर्व युनिट्सना स्पष्ट मार्गदर्शन दिले होते.

त्यानुसार 8 फेब्रुवारी 2026 रोजी दिघी व पिंपरी पोलीस स्टेशन हद्दीत पल्सर मोटारसायकलवर आलेल्या दोन इसमांनी महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र जबरदस्तीने हिसकावून नेल्याच्या घटनांचा तपास सुरू करण्यात आला.

तपासादरम्यान मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाने आरोपी ये-जा करत असलेल्या मार्गांवरील 200 ते 250 सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले. त्यातून गणेश भारत गिरी (वय 22, रा. बीड) याचा सहभाग निष्पन्न झाला. त्याला 14 फेब्रुवारी 2026 रोजी पिंपरी पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. 72/2025 अन्वये अटक करण्यात आली.

तपासात गणेश गिरी याने पिंपरी, दिघी, निगडी व चिखली पोलीस स्टेशन हद्दीत चेन चोरीचे गुन्हे केल्याचे स्पष्ट झाले. काही गुन्हे त्याने साथीदार रोहन राजू जाधव, पंकज गणेश दिवटे, सुमित सोपान चव्हाण आण ओमकार रामेश्वर लाटे यांच्यासोबत केल्याचे उघड झाले आहे. चिखली येथील गुन्ह्यातील आरोपी सुमित चव्हाण याला ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी चिखली पोलीस स्टेशनच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

आरोपी गणेश गिरी याच्यावर यापूर्वीही बीड जिल्ह्यात गंभीर स्वरूपाचे अनेक गुन्हे दाखल असून त्याच्यावर एमपीडीए कायद्यान्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आलेली होती.

ही संपूर्ण कारवाई मा. सह पोलीस आयुक्त शशिकांत महावरकर, मा. अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड, मा. पोलीस उपआयुक्त (गुन्हे) डॉ. शिवाजी पवार आणि मा. सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे-1) डॉ. विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय चव्हाण व मालमत्ता गुन्हे विरोधी पथकातील अधिकारी-अंमलदारांनी यशस्वीपणे पार पाडली.

या उल्लेखनीय कामगिरीमुळे शहरातील चेन चोरीच्या घटनांना आळा बसण्यास मोठी मदत होणार असल्याचे पोलीस प्रशासनाने सांगितले आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शनिवार दिनांक 21/02/२०२६

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# नवनियुक्त सदस्यांना महापौर रवि लांडगे यांनी दिल्या शुभेच्छा






दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आज झालेल्या सर्वसाधारण सभेत स्थायी समितीसह विधी, शहर सुधारणा, शिक्षण, महिला व बालकल्याण तसेच क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीवर सदस्यांची निवड करण्यात आली. या सर्व सदस्यांना महापौर रवि लांडगे यांनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.**

महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा आज संपन्न झाली. यामध्ये स्थायी समितीसह एकूण 5 विषय समित्यांच्या सदस्यपदावर निवड करण्याचा विषय सभापटलावर होता. पक्षीय बलाबलानुसार या समित्यांवर सदस्यांची नियुक्ती करण्यात आली. यामध्ये भारतीय जनता पक्षाच्या वतीने पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने गटनेते भाऊसाहेब भोईर आणि शिवसेना पक्षाच्या वतीने गटनेते विश्वजित बारणे यांनी विषय समितीनिहाय बंद लिफाफ्यात पिठासीन अधिकारी रवि लांडगे यांच्याकडे नावे सादर केली. यानंतर समितीनिहाय सदस्यांची नावे जाहीर करण्यात येऊन त्यांची निवड झाल्याचे पिठासीन अधिकारी रवि लांडगे यांनी घोषित केले. महानगरपालिकेच्या विविध विकासात्मक, सामाजिक व प्रशासकीय कामकाजासाठी या समित्या महत्त्वाची भूमिका बजावणार असून, नव्याने निवड झालेल्या सदस्यांकडून शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सकारात्मक कार्य होईल, असा विश्वास महापौर रवि लांडगे यांनी यावेळी व्यक्त केला.

पक्षनिहाय समितीमध्ये निवड झालेल्या सदस्यांची नावे खालीलप्रमाणे –

**स्थायी समिती**

अभिषेक बारणे, शालिनी गुजर, मनिषा चिंचवडे, संदीप कस्पटे, सारीका गायकवाड, योगिता नागरगोजे, कृष्णा सुरकुले, शीतल वर्णेकर, अर्चना कराडे, मधुरा शिंदे, बाबासाहेब त्रिभुवन (भारतीय जनता पार्टी)

सविता आसवानी, संतोष कोकणे, संदीप वाघेरे, विकास साने (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी)

सुलभा उबाळे (शिवसेना)

----------

**विधी समिती**

ज्ञानेश्वर जगताप, विनायक गायकवाड, कुंदा भिसे, सुजाता बोराटे, श्रुती डोळस, कुशाग्र कदम (भारतीय जनता पार्टी)

शेखर चिंचवडे, वर्षा जगताप, तुषार सहाणे (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी)

-----------

**शहर सुधारणा समिती**

अर्चना सस्ते, विनोद नढे, कुणाल वाव्हळकर, संजय (नाना) काटे, सुहास कांबळे, उत्तमराव केंदळे (भारतीय जनता पार्टी)

डॉ. वैशाली घोडेकर-लोंढे, अनंत कोऱ्हाळे, वैशाली काळभोर (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी)

---------

**क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कैलास कुटे, शाम जगताप, तानाजी बारणे, धर्मपाल तंतरपाळे, उदय गायकवाड, योगेश लांडगे (भारतीय जनता पार्टी)

भाऊसाहेब भोईर, जितेंद्र ननावरे, प्रमोद कुटे (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी)

--------

**शिक्षण समिती**

पल्लवी वाल्हेकर, श्रुती वाकडकर, रविना आंगोळकर, कविता भोंगाळे, रीटा सानप, सारिका बोऱ्हाडे (भारतीय जनता पार्टी)

प्रियांका कुदळे, योगिता बारणे, यश साने (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी)

----------

**महिला व बालकल्याण समिती**

पल्लवी जगताप, नीता पाडाळे, रेश्मा भुजबळ, शिवानी नरळे, राणी पठारे, सुप्रिया चांदगुडे (भारतीय जनता पार्टी)

निकिता कदम, सारिका मासूळकर, मनिषा लांडे (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी)

निवड झालेल्या सर्व समिती सदस्यांचा पिठासीन अधिकारी तथा महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, सत्तारुढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्यासह नगरसदस्य व महापालिका अधिकारी उपस्थित होते.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968